Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 388 – 391
DOI: 10.5281/zenodo.10129698

Original Research Article

# महात्मा गांधीजींच्या शेती व ग्रामीण विकास दृष्टीकोनाची प्रासंगिकता

प्रा. अमोल अरुण पगार

विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव ता. चाकूर जि. लातूर ४१३५८१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: pagar.amol121@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

भारतीय स्वातंत्र्याचे शिल्पकार, जगाला सत्य अहिंसा आणि सदाचार या शाश्वत मूल्यांची शिकवण देणारे आणि शांततेच्या मार्गाने जग जिंकता येते अशी जगाला शिकवण देणारे आणि ज्यांचे विचार जगात कधीही लुप्त होणार नाहीत काल परत्वे ते प्रासंगिक वाटत जातील असे राष्ट्रपिता महात्मा गांधी आज संपूर्ण जगाला परिचित आहेत. महात्मा गांधी हे कुणी मोठे विचारवंत, समाजकारणी, राजकारणी किंवा अर्थतज्ञ नव्हते त्यांनी सर्वसामान्य माणसांना जगण्यासाठी आणि देशाच्या हितासाठी जे मत मांडले होते तसेच जीवन जगण्याची जी पद्धत अंगीकारली होती ती संपूर्ण समाजाला आदर्शाचा एक उत्तम नमुना आहे. महात्मा गांधी यांच्या विचारांमध्ये जी ताकद आहे ती आजच्या पिढीतील लोकांना विचार करायला लावणारी आहे. आज आपण जगामध्ये पाहतोय युक्रेन आणि रशिया या राष्ट्रांमध्ये तसेच हमास व इजराइल या देशांमध्ये खूप मोठा संघर्ष सुरू आहे. संघर्षात सामील झालेल्या राष्ट्रांचे खूप मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी होत आहे ही सर्व परिस्थिती महात्मा गांधीजी यांच्या विचारांच्या विपरीत आहे. या राष्ट्रांच्या संघर्षातून एक वेळ अशी येईल की संघर्ष थांबल्यानंतर त्यांच्यामध्ये जीवन जगण्याचा आणि आर्थिक उन्नती करण्याचा संघर्ष निर्माण होईल. म्हणजेच युद्धासारखा मार्ग अवलंबल्यामुळे जी हानी होईल त्यातून राष्ट्रांना अनेक वर्ष विकास प्रक्रियेत घालवावे लागतील याचा विचार राष्ट्रांनी आज करणे गरजेचे आहे. त्यामुळे अहिंसात्मक मार्गाने चालणे हे देश हिताचे आहे. त्यासाठी गांधी विचारांची आवश्यकता आहे.

जगातील बहुतांश देश कृषीप्रधान असून अश्या देश्यांच्या अर्थव्यवस्था विकसनशील आहेत तर विकसित राष्ट्रांमध्ये विकासाबाबत स्पर्धा सुरू आहेत या स्पर्धेत सर्वसामान्य माणसांचा विचार करणारी व्यवस्था कोलमडून पडली आहे.

सर्वसामान्य माणसांचे कल्याण होईल अशी व्यवस्था निर्माण न होता. विषमता निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळे समतावादी आणि सगळयांना समान पद्धतीने विकासाकडे घेऊन जाणारी पद्धत गांधी विचारांमध्ये दिसते. महात्मा गांधी यांनी जे विचार मांडलेत ते आजच्या विकसनशील देशांसाठी महत्त्वाचे वाटतात.म्हणून प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून महात्मा गांधी यांच्या शेती व ग्रामीण विकास या दृष्टिकोनावर संशोधनात्मक प्रकाश टाकण्यात आला आहे.

**शेतीविषयक विचार**

महात्मा गांधीजींच्या काळात देशाची लोकसंख्या साधारणता: ३३ कोटी होती. त्यातील ८५% म्हणजेच २८ कोटी लोक खेड्यात राहत होते. त्यांच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन शेती हे होते. हे चित्र डोळयासमोर ठेवूनच गांधीजींनी स्वतंत्र भारताच्या विकासाचे जे प्रारूप तयार केले होते त्यामध्ये खेड्यांचा शाश्वत विकास झाल्याशिवाय भारताचा विकास होणार नाही. खेड्यांचा विकास हा शेती व शेतकऱ्यांचा विकास झाल्याशिवाय शक्य नाही आणि शेती हा निसर्गावर अवलंबून असणारा व्यवसाय आहे. निसर्गाचे रक्षण व संवर्धन करणे ही केवळ खेड्यांची जबाबदारी नसून जगातील सर्वांची असल्यामुळे सर्वांनीच आपल्या गरजांना मर्यादा घालण्याचा संदेश त्यांनी त्यांच्या जीवनशैली मधून दिला होता. हा संदेश आपण गेल्या ७० वर्षात गांभीर्याने न घेतल्यामुळे भारतासह जगातील सर्वच कृषिप्रधान राष्ट्रातील कृषी व्यवसाय अडचणीत आला आहे.

आज भारतातील एकूण सहा लाख ३४ हजार खेड्यांपैकी ७० टक्के लोक म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या साधारणता: ८५ कोटी लोक खेड्यांमध्ये राहतात आणि त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे परंतु शेती, शेतकरी यांच्या विकासाकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यामुळे ग्रामीण भागाचा विकास झाला नाही. पर्यायाने देशाचा विकास झाला नाही. देशात आजही ३८ % लोक गरीब आहेत आणि गरिबांचे सगळयात जास्त प्रमाण ग्रामीण भागामध्ये आहे. आणि बहुसंख्य गरीब लोक शेतकरी शेतमजूर आहेत. महात्मा गांधीजी यांनी शेती विकासाबाबत केलेले मार्गदर्शन हे त्यांच्या आचरणातून आहे. त्यामुळे गांधीजी यांनी शेती शेतकरी याबाबतचे सांगितलेले उपाय तत्कालीन परिस्थितीमध्ये कसे उपयोगी आहेत ते पुढील प्रमाणे पाहता येईल.

महात्मा गांधी यांनी वैयक्तिक पातळीवर शेतीमधील पहिला प्रयोग दक्षिण आफ्रिकेतील फिनिक्स फार्ममध्ये केला होता. त्यांच्या मते शेतकऱ्यांचे, कष्ट करणाऱ्यांचे जीवन हेच खरे जीवन आहे हा विचार त्यांचा होता. आज लोक कष्ट न करता जीवन जगण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यातही शारीरिक श्रम अजिबात नाही, त्यामुळे अनेक आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्याबरोबरच शेती व्यवसायातूनही अनारोग्य पसरलेले आहे. त्याचे कारण म्हणजे आपल्याला जमिनीचे आरोग्य सांभाळता आले नाही. जमीन, वनस्पती, मनुष्य व प्राणी यांच्या आरोग्य एकमेकाला जोडलेले आहे जमिनीचा आरोग्य बिघडलं की वनस्पतीच्या बिघडतं वनस्पतीच्या बिघडलं की प्राण्यांच्या आणि मनुष्याचे बिघडते. जमिनीतले खनिज द्रव्य तशीच कमी होऊ लागतात तसं आजारांचे प्रमाण वाढत जातं आजाराचं मूळ कारण हे निकस आहार आहे आणि निकस आहाराचे मूळ हे जमिनीची सुपीकता कमी होणे आहे. जमिनीची सुपीकतेचा ऱ्हास हा आपल्या

चुकीच्या जीवनशैली आणि विकास यामुळे झालेला आहे. भारताची लोकसंख्या दरवर्षी झपाट्याने वाढत आहे आणि भारतात हरित क्रांती मूळ उत्पादन वाढले आहे असे म्हटले जाते परंतु हरितक्रांती च्या माध्यमातून रासायनिक खतांचा मारा शेतीमध्ये केला जाऊ लागला संकरित बी बियाणे कीटकनाशके तणनाशके यांचा वापर होऊ लागला आणि त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी झाली जमिनीतले मुख्य उपजावघटक यांचा ऱ्हास झाला आणि शेतीची उत्पादकता कमी कमी होऊ लागली आणि त्याचे परिणाम लोकांच्या आरोग्यावर होऊ लागलेत. म्हणून शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करताना रासायनिक खते कीटकनाशके या सगळयांच्या वापरा ऐवजी सेंद्रिय शेतीचा वापर करून अधिक उत्पादन कसं करता येईल याबाबतचे संशोधन देशांमध्ये झाले पाहिजे आणि उत्पादन वाढीचा प्रयत्न झाला पाहिजे.

**ग्रामीण विकास**

महात्मा गांधी यांनी खेड्याकडे चला असा संदेश दिला होता. कारण गांधीजींच्या मते खरा भारत खेड्यात राहतो. जो पर्यंत खेड्यातील प्रत्येक व्यक्ती स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर होत नाही तो पर्यंत देशाचा विकास होणार नाही. ग्रामीण भारताचा विकास हाच सर्वांगीण विकास आहे कारण खेड्यांच्या विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही आणि त्यासाठी प्रत्येक गाव स्वावलंबी झालं पाहिजे आत्मनिर्भर झालं पाहिजे अशी त्यांची धारणा होती. पण आज शहरांना विकासाची सूज येऊ लागली आहे तर खेडे बकाल होऊ लागले आहेत. आजही भारतातील खेड्यापाड्यांपर्यंत मूलभूत सुविधा लोकांना मिळत नाही. भारताची आर्थिक पाहणी अहवाल २०२२ नुसार ग्रामीण भागातील ६१.५ % लोकांनाच पिण्याचे शुद्ध पाणी मिळते. ११२०४ गावांना अजूनही कसल्याही प्रकारचे रस्ते नाहीत. १.५ कोटी भारतीयांकडे विजेचे कनेक्शन आहेत पण वीज मिळत नाही. तर ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेची स्थिती अत्यंत दयनीय आहे. महात्मा गांधी यांना खेडे स्वयंपूर्ण झाले पाहिजे खेड्यातल्या लोकांच्या गरजा खेड्यात पूर्ण झाल्या पाहिजे, शेतीत तयार होणाऱ्या मालावर प्रक्रिया खेड्यात झाली पाहिजे, ग्रामीण उद्योगधंद्यांचा विकास झाला पाहिजे असे अभिप्रेत होते परंतु उद्योगधंद्यांचा विकास मात्र शहरांमध्येच होऊ लागला आहे. खेड्यातील अनेक उद्योग आज आजारी अवस्थेत असून त्यांचे पुन्नरुजीवन होणे आवश्यक आहे. देशातील सरकारने सगळयात जास्त लक्ष्य ग्रामीण विकास व उन्नतीवर केले पाहिजे. गांधीजींचा ग्रामीण विकासाचा पाया नैतिकता, साधेपणा, श्रमाधारित जीवन यावर आधारित होता. हा विचार आज अंगीकारणे महत्वाचे आहे.

**निष्कर्ष**

१. शेती हा निसर्गावर अवलंबून असणारा व्यवसाय असून निसर्गाचे संवर्धन करण्याची जबाबदारी केवळ शेतकरी व ग्रामीण लोक यांची नसून सर्वांची आहे.
२. शेती व शेतकरी यांच्याकडे सरकारांनी विशेष लक्ष्य न दिल्याने बरयाचसमस्या निर्माण झाल्या आहेत.
३. शेतीमध्ये रासायनिक खतांच्या अतिरेकी वापरामुळे जमिनीचे आरोग्य बिगडून मानवी आरोग्यावर त्याचे विपरीत परिणाम होऊ लागले आहेत.
४. जो पर्यंत खेड्यातील प्रत्येक व्यक्ती स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर होत नाही तो पर्यंत देशाचा विकास होणार नाही.
५. ग्रामीण भागात उद्योगांचा विकास होणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची**


१. Barure Shailaja,(Edit), (2019), Gandhian Thought:Past,Present and Future, Chronical of Humanities and Cultural Studies,Special Issue-2, Vol.5,

२. देसाई मु. व भालेराव निर्मल, (२००४), 'आर्थिक विचारांचा इतिहास', निराली प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती.

३. कुलकर्णी दिलीप (संपा), (२०१९),'गांधी उद्यासाठी', राजहंस प्रकाशन, पुणे.

४. पाटील विश्वास,(२०११), ‘समर्पित गांधी’, गांधी रिसर्च फौंन्डेशन, जळगाव, प्रथम आवृत्ती.